# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
## अवसरी (खुर्द),ता. आंबेगाव, जि.पुणे - ४१२४०५

दूरध्वनी क्र. ०२१३३-२३०५८२ ई मेल - gcoeara@gmail.com

फॅक्स क्र. ०२१३३-२३०५८३ वेबसाईट : www.gcoeara.ac.in

## मुलींच्या वसतीगृहातील खानावळीसाठी निविदा अर्ज

### अ ) अर्जदाराबाबतची व्यवसायासंबंधी माहिती

अर्जदाराचे संपूर्ण नाव - ..............................................................................

१) अर्जदाराचा संपूर्ण पत्ता- ..............................................................................

.............................................................. पिन कोड ...............................

२) शैक्षणिक पात्रता- ..............................................................................

३) अ- खानावळ चालविण्याचा अनुभव आहे काय ? होय / नाही

ब- असल्यास कोणत्या संस्थेच्या खानावळीचा ..........................................................

अनुभव आहे त्याचे नाव पत्ता व दूरध्वनी क्रमांक ..........................................................

क- खानावळ चालवण्याच्या अनुभवाचे प्रमाणपत्र होय / नाही
( कालावधी व खानावळीच्या क्षमतेचा उल्लेख
असावा) सादर केले आहे काय ?

ड- ग्रामीण आरोग्य विभागाचा परवाना जोडला आहे काय ? होय / नाही

इ - अन्न व औषध प्रशासनाचा परवाना जोडला आहे काय ? होय / नाही

४) अर्जदाराविरुध्द कोणत्याही प्रकारची तक्रार / खटला पोलीस आहे / नाही
ठाण्यात प्रलंबीत आहे का ?
असल्यास तपशील दयावा.

( या व्यतिरीक्त अनुभवासंदर्भात माहिती द्यावयाची असल्यास वेगळया पानावर नमुद करावी)

## ब ) निविदा अर्ज

१ ) मुलींचे दरमहा जेवणाचा दर ( सोबतच्या मेनूकार्डप्रमाणे ) रु. . . . . . . . . . . . . . .
दोन्ही वेळेला पोटभर जेवण देणे अनिवार्य आहे.

२) अ) एका महिन्याचे किमान ५ पेक्षा जास्त खाडे . . . . . . . . . . . . . . . .
मान्य असल्यास ती संख्या

ब) एकवेळच्या खाडयाचा दर रु. . . . . . . . . . . . . . .

३) एका वेळेचा गेस्ट चार्ज (पाहुणे असल्यास) रु. . . . . . . . . . . . . . . .
(पाहुणे म्हणजे संस्थेच्या वसतीगृहात प्रशिक्षणासाठी आलेले व तात्पुरत्या निवासासाठी असलेले विद्यार्थी, वसतीगृहात शासकीय कामाने वास्तव्यात असलेले अधिकारी / कर्मचारी अथवा संस्थेचे अधिकारी / कर्मचारी )

४) नाष्टयाचा मेनू व दर (नाष्टा घेणे ऐच्छीक) रु. . . . . . . . . . . . . . . .

५) चहाचा दर ( चहा घेणे ऐच्छीक ) रु. . . . . . . . . . . . . . . .

मी खालील सही करणार . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो की, वरीलप्रमाणे निविदा अर्जात माझ्याबद्दल दिलेली माहिती खरी आहे. जर माहिती खोटी आढळल्यास करार रद्द करण्यात यावा. तसेच मी दिलेले दर मंजूर झाल्यास संस्थाप्रमुखांच्या पूर्वपरवानगी शिवाय हया दरामध्ये कोणताही बदल करणार नाही. हया निविदा अर्जाच्या सोबतच्या अटी व शर्ती मला प्राप्त झाल्या असून त्याचे मला आकलन झालेले आहे.

मला संस्थेच्या मुलींच्या वसतीगृहासाठी असलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असून त्याचे अधिन राहून मी वरील दरपत्रक सादर करीत आहे.

अर्जदाराची सही

(अर्जदाराचे नाव - )

अर्जदाराचा संपूर्ण पत्ता (दूरध्वनी क्रमांकासह) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द)
## मुलींच्या वसतीगृहातील खानावळ : अटी व शर्ती

१. मुलींच्या खानावळीमध्ये महिला कर्मचारीच नेमणे आवश्यक राहील. फक्त अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्येच प्राचार्य व रेक्टर यांच्या पूर्वपरवानगीने या अटीमधून सूट देण्याचा विचार करता येईल.

२. वसतीगृहातील दोन्ही वेळेला जेवण घेण्या-या मुलींची अंदाजे संख्या २२० ते २३० असेल, व चहा व नाष्टा घेणे ऐच्छीक राहील.

३. खानावळ चालकांकडे ग्रामीण आरोग्य विभागाचा दाखला, अन्न व औषध प्रशासनाचा दाखला इ. कागदपत्रे असणे अनिवार्य आहेत. त्याची प्रत निविदेसोबत जोडावी.

४. स्वयंपाकासाठीचे स्वयंपाकघर,पाणी कनेक्शन, गॅस कनेक्शनसाठीचे पाईपिंग, स्वयंपाकाची व जेवणासाठी आवश्यक भांडी संस्था पुरवेल. त्याचे भाडे रु. ६०००/- दरमहा करार सुरु झाल्यापासून करार संपेपर्यंत (सुटीचे दिवस धरुन ) खानावळ चालकांनी भरणे आवश्यक आहे.

५. तेल, गहू, तांदूळ, डाळी, कडधान्य, भाज्या इ. जेवणाचे घटक पदार्थ चांगल्या प्रतीचे असणे आवश्यक राहील. बनविलेले सर्व अन्नपदार्थ ताजे, स्वच्छ व गरम असावेत.

६. दररोजच्या जेवणामध्ये सोबतच्या मेनूकार्डप्रमाणे मेनू देणे आवश्यक आहे. मेनूमध्ये काही कारणाने बदल अपरिहार्य असल्यास होस्टेल रेक्टरना त्याची पूर्वसूचना द्यावी लागेल.

७. दरमहा ५ जेवणाचे खाडे ( गैरहजेरी) गृहीत धरण्यात येतील.

८. कंत्राटदाराने ओला व सुका कचरा इ.ची विल्हेवाट स्वतःची स्वतः करणे आवश्यक राहील. तसेच कच-याच्या दुर्गंधीपासून आरोग्यास धोका निर्माण होणार नाही याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

९. संस्थेच्या अधिकृत विद्यार्थीनीशिवाय बाहेरील व्यक्तींना खानावळीत प्रवेश देवू नये अथवा त्यांना डबा देण्याची सुध्दा परवानगी नाही.(विद्यार्थीनीचे पालक किंवा नातेवाईक असल्यास रेक्टर यांच्या परवानगीनंतर गेस्ट चार्ज आकारुन देणे)

१०. रु. १,५०,०००/- ( रु. एक लाख पन्नास हजार फक्त ) अनामत रक्कम संस्थेत जमा करुनच करार अस्तित्वात येईल.

११. कराराची मुदत एक वर्ष असेल. तथापी खानावळीच्या त्या वर्षातील कामकाजाचे मूल्यमापन करुन पुढील वर्षासाठी मुदतवाढ देण्याचे अधिकार मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना आहेत. कराराची मुदत संपल्यानंतर सर्व साहित्य संस्थेकडे जमा करण्यात यावे. त्यानंतरच कंत्राटदारांची अनामत रक्कम परत केली जाईल.

१२. कंत्राटदारांनी करार व अटीचे मान्यतेचे करारपत्र रु १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करावे लागेल. खानावळीचे कामकाजाबाबत कोणतीही तक्रार असल्यास त्याची शहानिशा करुन सदर करार तात्काळ संपुष्टात आणण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना राहतील.

१३. मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांचे सुचनेनुसार खानावळीची आकस्मिक तपासणी वेळोवेळी करण्यांत येईल. कंत्राटदाराने तपासणीच्यावेळी सहकार्य करावे.

१४. खानावळीमध्ये मद्यपान / धुम्रपान / अंमली पदार्थांचे सेवन व विक्री करण्यास सक्त मनाई आहे.

१५. खानावळीतील अन्नाचा दर्जा आरोग्यास हितकारक असावा. खानावळीतील अन्नापासून विद्यार्थीनींना अथवा इतरांना कोणत्याही प्रकारची बाधा झाल्यास त्याची सर्व जबाबदारी खानावळ चालकावर राहील.

१६. कोणतेही कारण न देता सदर निविदा प्रक्रिया रदद करण्याचे अधिकार संस्थेकडे राखीव आहेत.

१७. पॅनकार्डची झेरॉक्स प्रत निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

१८. खानावळीमध्ये कोणत्याही कर्मचा-यास राहण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

१९. खानावळीमध्ये काम करणा-या कर्मचा-यांच्या आरोग्याचा वैद्यकीय दाखला घेवून त्यांची संपूर्ण माहिती संस्थेस द्यावी लागेल.

२०. सेवा कर (Service Tax) नोंदणीचे प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

२१. खानावळीच्या जागेचा वापर दुस-या कोणत्याही व्यवसायासाठी करता येणार नाही. तसे आढळून आल्यास करार तत्काळ रद्द केला जाईल.

२२. विद्यार्थीनींच्या परीक्षेच्या पूर्वतयारी कालावधीदरम्यान व परीक्षेच्या कालावधीमधे खानावळीच्या मासिक दराची आकारणी प्राचार्यांच्या सूचनेनुसार करावी लागेल.

२३. विद्यार्थीनींकडून जेवणाच्या मासिक दराच्या वसूलीची पूर्ण जबाबदारी कंत्राटदाराचीच राहील.

२४. खानावळीची वेळ प्राचार्य, रेक्टर व विद्यार्थीनींच्या चर्चेनुसार ठरविली जाईल.

२५. निविदा सादर करताना रु.२०००/- ( परत न मिळणारी निविदा फॉर्म फी ) संस्थेत रोखीने जमा करुन त्याची शासकीय पावती निविदेसोबत जोडावी. शासकीय पावती जोडलेली नसल्यास निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

( प्रा. श्री.वि. जोशी )
प्र. प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, (अवसरी खुर्द)

# मुलींचे वसतिगृह मेनू कार्ड २०१६-१७

| | सकाळ | | | | संध्याकाळ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वार | सुकी भाजी | पातळ भाजी | वरण भात | सलाड | सुकी भाजी | पातळ भाजी | गोड (आलटून पालटून) | वरण भात | सलाड |
| सोम | मसाला भेंडी (कोरडी) (छोटे काप करून) | वाटणा | तूर | टोमॅटो/ बीट | पिवळा बटाटा | शेव भाजी | गुलाबजामून (३सेमी व्यास, ०६ नग)<br>बालुशाही (०२ नग)<br>जिलेबी (०३ नग)<br>म्हैसूर पाक (०२ नग)<br>हलवा (गाजर/बीट) | दाल तडका आणि जीरा राईस | कोशिंबीर/ मठ्ठा, भजी(पालक/कांदा/ मुगाच्या डाळीची) |
| मंगळ | मेथी (कुट टाकून) | चवळी | सांबार | मुळा/ गाजर | शिमला मिरची (बेसन पीठ घालून)(कोरडी) | मटकी (मोड आलेले) | - | तूर | टोमॅटो/ बीट |
| बुध | मसाला वांगी (कुट भरून) | मिक्स व्हेज | मुग | काकडी /गाजर | फ्लॉवर/भोपळा /पिठलं | पाट वड्या | - | दाल तडका आणि जीरा राईस | काकडी/ मुळा |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गुरु | करडई पालेभाजी/ऋतुमाना नुसार पालेभाजी (बेसन पीठ घालून) (कोरडी)<br>साबुदाणा खिचडी /साबुदाणा वडा, दही, दोन वेगवेगळी फळे | राजमा | मुग | टोमॅटो/ बीट | पाव भाजी<br>पुरी आणि छोले भाजी<br>मिसळ पाव<br>पाव भाजी<br>पुरी आणि छोले भाजी | - | शेवयांची खीर/शिरा | मसाले भात | मुळा/गाजर |
| शुक्र | गवार/कारले | बटाटा (साल काढून) | तूर | काकडी /मुळा | मुग डाळ कोरडी भाजी | हरभरा (मोड आलेले) | - | तूर | मिक्स |
| शनी | मटकी उसळ (मोड आलेले) | कढी | दाल तडका आणि जीरा राईस | टोमॅटो/ गाजर | कांदा/कोथंबीर झुणका भाकरी | उडीद आमटी | - | मुग | कांदा |
| रवी | टोमॅटो चटणी | आख्खा मसूर | तूर | मिक्स | पालक (कापून) | छोले | - | मसाले भात/ पुलाव | टोमॅटो/ काकडी |

रोज सकाळ आणि संध्याकाळ :- लोणचे ( कैरी / लिंबू / मिक्स)

रोज सकाळ आणि संध्याकाळ :- भात + चपाती (गुरुवार वगळून)

रोज सकाळ आणि संध्याकाळ :- दही आणि पापड

रोज संध्याकाळ :- चटणी ( शेंगदाणा / जवस / कारळे )

01/06/2016
[श्रीमती यो. ना. चौधरी]
कुलमंत्री
मुलींचे वसतीगृह